# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:— शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.ए. (आय.बी.), बी.एम.एस., बी.सी.ए., बी.बी.ए. (सी.ए.), एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत...**

**संदर्भ :— १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/बीबीए—बीसीए/विकाप/२०२६/२१५, दि. २०/०४/२०२६.**

**२) मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे पत्र क्र. शुल्कनि—२०२६/प्र.क्र.१९/तांशि—४, दि. १७/०४/२०२६.**

**३) विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/१३९६, दि. ०३/०६/२०२५.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासनाच्या संदर्भ क्र. २ अन्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमाकरिता शैक्षणिक वर्ष २०२४—२५ हे संक्रमण कालावधी वर्ष असल्याने, शासनाच्या दि. २०/०५/२०२५ अन्वये सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करून, त्याबाबतची माहिती संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांना सादर करण्याचे निर्देश दिले होते.

शासन निर्देशानुसार व्यापक विद्यार्थीहित विचारात घेता, भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी संबंधित विद्यापीठांनी ठरविलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करिता देखील लागू करावे असे कळविले आहे.

**तरी संदर्भ क्र. ३ मधील परिपत्रकान्वये वरील अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी विद्यापीठाने ठरवून दिलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करिता देखील Adhoc Fee म्हणून घेण्यात यावी.** तसेच, संबंधित संस्थांनी डीबीटी पोर्टलवर त्या प्रमाणे शुल्क भरून व मंजूर करून घेऊन, शिष्यवृत्ती/फी प्रतिपूर्ती योजना करिता अर्ज स्विकृती तातडीने करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या दृष्टीने तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करण्यात यावा.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शिक्षण शुल्क रू. (Tution Fee Rs.) | विकास शुल्क रू. (Development Fee Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | B.B.A./B.B.A. (I.B.)/B.M.S./ M.B.A. (Integrated) | 35000/- | 3500/- |
| 2 | B.C.A./B.B.A. (C.A.)/ M.C.A. (Integrated) | 40000/- | 4000/- |

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/२०६३
दिनांक : २२/०४/२०२६

**प्रत:**
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेल: fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ: www.mahafra.org
दुरध्वनी: ०२२-३११९८०३४८ / मोबाईल क्र.८८२८७८६२६४

## ९०वी शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त

दिनांक : १७ जुलै, २०२६

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११ (२)(३)(४) या मजकुराऐवजी सुधारणा अधिनियम, २०२६ अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची बैठक दि.१७ जुलै, २०२६ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री. समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि)<br>अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | श्री.नितीन बापुराव चव्हाण<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ३ | श्री.अतुल दामोदर धारप<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ५ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ६ | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण<br>प्रतिनिधी डॉ दिनकर केकन (ओएसडी)महाराष्ट्राच्या वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयात | उपस्थित |
| ७ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ८ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ९ | श्री समीर कुर्तकोटी, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालय
मुंबई, महाराष्ट्र राज्य

शु.नि.प्रा.
१७.०७.२०२६

विषय क्र.१: दिनांक १३ जुलै २०२६ रोजी झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

"चर्चा झाली.

दि. १३ जुलै २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि मंजूर झाले".

विषय क्र.२: शुल्क निश्चितीसाठी प्रलंबीत असणा-या प्रस्तावांवर अंतरिम शुल्क (Interim fee) निश्चित करुन जाहीर करणे.

"चर्चा झाली.

प्रवेश प्रक्रिया व शैक्षणिक वर्ष लवकरच सुरु होत असल्याने, महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) सुधारणा अधिनियम, २०२६, कलम १४(२) मधील तरतुदीनुसार, ज्या शैक्षणिक संस्थांच्या शुल्क निश्चिती प्रस्तावांवर प्राधिकरणाचा अद्याप पर्यंत अंतिम निर्णय झालेला नाही, अशा संस्थांचा अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मंजूर/ प्रमाणित असलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अंतरिम शुल्क (Interim fee) म्हणून आकारण्यास संबंधित संस्थांना मंजुरी देण्यात येत आहे.

प्राधिकरणाकडून संबंधित संस्थेचे अंतिम शुल्क निश्चित करून जाहीर झाल्यानंतर ते शुल्क तात्काळ लागू राहील. जर अंतिम मंजूर शुल्क हे अंतरिम शुल्कापेक्षा कमी असल्यास, संस्थेने विद्यार्थ्यांकडून आकारलेली जास्तीची शुल्काची रक्कम कोणत्याही विलंबाशिवाय संबंधित विद्यार्थ्यांना परत करावी. तसेच, प्राधिकरणाकडून शुल्काबाबतचा अंतिम शुल्काचा निर्णय जाहीर होताच, संबंधित शैक्षणिक वर्षासाठी निश्चित करण्यात आलेले अंतिम शुल्क संस्थेस त्वरित लागू राहील.

सदर अंतरिम शुल्काची संस्था व अभ्यासक्रमनिहाय यादी या ठरावास परिशिष्ट म्हणून जोडण्यात आलेली आहे.

संबंधित सर्व शैक्षणिक संस्थांनी या निर्णयाची माहिती विद्यार्थी, पालक तसेच इतर हितसंबंधित धारकांना योग्य त्या माध्यमातून तात्काळ अवगत करावी".

विषय क्र.३: नवीन अभ्यासक्रमांसाठी तदर्थ शुल्क (Ad-hoc fee) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी निश्चित करुन जाहीर करणे.

"चर्चा झाली.

सदर विषयावरील पुढील विचारासाठी तो पुढील बैठकीपर्यंत पुढे ढकलण्यात आला".

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य